# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### गोंदिया जिल्हयातील इटियाडोह, पुजारीटोला, कालीसगड व शिरपूर धरणग्रस्तांना शासकीय नोकरी मिळण्याबात

**(१) ५२५९ (०४-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील इटियाडोह, पुजारीटोला, कालीसगड व शिरपूर धरणाच्या बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांची शेतजमीन व घरे ४० वर्षापूर्वी जाऊनसुध्दा या प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्तांना अद्यापपर्यंत शासकीय नोकरी मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्तांपैकी आजपर्यंत किती जणांना नोक-या मिळाल्या व किती जण प्रतीक्षेत आहेत,

(३) असल्यास, नोकऱ्या न देण्याच्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यातील इटियाडोड, पुजारीटोला, कालीसरार व शिरपुर धरणाच्या बुडीत क्षेत्रात शेतकऱ्यांची शेतजमीन व घरे ४० वर्षापुर्वी गेलेली आहेत. सदर धरणाच्या क्षेत्रात शेतजमिन व घरे गेलेल्या शेतकऱ्यांना प्रकल्पानिहाय, इटियाडोह-२३, पुजारीटोला-८४, कालीसरार-१२ व शिरपुर-१७ या प्रमाणे प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यापैकी एकुण ६४ प्रकल्पग्रस्तांना नौकरी दिल्याची अभिलेखात नोंद आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२७.१०.२००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका पात्रता तपासुन व स्पर्धा परिक्षेद्वारे व गुणवत्तेनुसार करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोयगांव (ता.जि.औरंगाबाद) येथील प्रादेशिक परिवहन विभागाच्या दुर्लक्षामुळे कालबाह्य वाहने रस्त्यावर चालविण्यात येत असल्याबाबत

**(२) १०३९६ (०८-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयगांव (ता.जि.औरंगाबाद) येथील प्रादेशिक परिवहन विभागाच्या दुर्लक्षामुळे शेकडो कालबाह्य वाहने सर्रास रस्त्यावर चालविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारणामुळे वाहनांच्या अपघातांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सर्वसामान्याचा जीव धोक्यात आला आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०९-२०१६) :**(१) नाही.

(२) मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्या अंतर्गत बनविलेल्या नियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील वायुवेग पथकांमार्फत तपासणी करुन दोषी वाहनांवर कारवाई करण्यात येते.

दि.०१.०४.२०१४ ते दि.३१.०३.२०१५ या कालावधीत एकूण ६३२ परिवहनेत्तर वाहनांची तपासणी करुन नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात आले व एकूण १८४ परिवहनेत्तर वाहनांची नोंदणी यांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याने नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले.

तसेच सदर कालावधीत एकूण १६८९८ परिवहन वाहनांची तपासणी केली गेली. एकूण ४४२८ दोषी वाहनांना तपासणी प्रतिवेदने देऊन या वाहनांकडून एकूण रु.४२,९४,७८९/- एवढा दंड वसूल करण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अल्पसख्यांक समुदायाच्या विविध न्याय्य मागण्यांसंदर्भात तसेच समाज विकासासाठीच्या विविध शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३) २९००९ (१३-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसख्यांक समुदायाच्या विविध न्याय्य मागण्यांच्या सोडवणुकी संदर्भात तसेच समाज विकासासाठीच्या विविध शिफारशीची यथार्थ अंमलबजावणी करण्याबाबतची मागणी समाजवादी पक्षातर्फे राज्यातील मुख्यालयी, तसेच विभागीय महसूल आयुक्तालये, जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हाउपविभाग कार्यालये, तालुका पातळीवरील संबंधित महसुली कार्यालये, त्याचबरोबर अल्पसंख्यांक क्षेत्रातील कार्यालयाकडे दिनांक ९ सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास) राज्यमंत्री (अल्पसंख्यांक

विकास), अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल व अल्पसंख्यांक विकास), संबधित महसुली विभागाचे विभागीय आयुक्त, संबधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि संबधित महसुली विभागाचे उपविभागीय जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीअंती कोणती निर्णायक उपाययोजना केली वा करण्याचे प्रस्तावित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) सदरचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वणी तालुक्याच्या (जि.यवतमाळ) अंतिम टोकावर वसलेले मुंगोली गाव चोहोबाजूनी वेकोलिच्या विळख्यात सापडले असल्याबाबत

**(४) ३०५१० (१८-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी तालुक्याच्या (जि.यवतमाळ) अंतिम टोकावर वसलेले मुंगोली गाव चोहोबाजूनी वेकोलिच्या विळख्यात सापडले असून वेकालिमध्ये होणाऱ्या स्फोटमुळे मुंगोली गावातील नवनाथ दुर्गे, गणपत टेकाम यांच्यासह २० नागरीकांची घरे पडली, याबाबतची माहिती वेकोलि व महसूल प्रशासनाला देण्यात येऊनही कोणतीच कार्यवाही न झाल्याने गेल्या २० वर्षापासून येथील गावकरी भीतीच्या वातावरणात गावात राहत असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वेकोलिच्या बेजबाबदारपणामुळे अनेकांवर आर्थिक संकट कोसळले असून याबाबत प्रशासनाने सदरील गावकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) मुंगोली गावातील ४२ घरांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. वेकोलीच्या स्तरावर घरांचे नुकसानीबाबत समिती स्थापन केली असुन सदर कमेटीने वेकोलीच्या स्फोटामुळे घरांचे नुकसान झाले नसल्याने वेकोलीकडुन मोबदला देता येत नसल्याचे कळविले आहे. मात्र वेकोलीने सर्व्हे करुन ४२ घरांचे दुरुस्तीबाबत कार्यवाही करीत असून नवनाथ दुर्गेसह १८ घरांचे दुरुस्तीचे कामे पुर्ण झाले आहे. इतर काम प्रगतीवर असल्याचे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लिपी केपीसीएल अंतर्गत असलेल्या चंद्रपूर जिल्हयातील बरांज व परिसरातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ५० टक्के जमिनी परत करण्याबाबत**

**(५) ३२४९३ (१२-०१-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लिपी केपीसीएल अंतर्गत असलेल्या चंद्रपूर जिल्हयातील बरांज व परिसरातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ५० टक्के जमिनी परत करणे व विविध प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश केंद्रिय रसायन व उर्वरक मंत्री यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१५ रोजी संबधित अधिकाऱ्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय मंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार आतापर्यंत या प्रकल्पग्रस्तांच्या ५० टक्के जमिनी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) मा.केंद्रिय मंत्री, रसायन व खते यांचे निवेदना संदर्भात मा.मुख्यमंत्री यांचे स्तरावरुन दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी बैठक झाली. या बैठकीत खलीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.
१) ५०% जमीन परत करणे.

i) कोळसा खदरनीतून कोळसा काढण्याचे काम पूर्ण झाल्याबाबत संबंधित प्राधिकरणाने प्रमाणित केल्यानंतर जमिनीच्या मूळ मालकाला त्याच्या संपादित जमिनीच्या ५०% इतकी जमीन परत देण्यात यावी.

ii) के.पी.सी.एल. ५०% जमीन मूळ खतेदारास परत देण्यास असमर्थ असल्यास मूळ खातेदारास देय जमिनीच्या बदल्यात प्रती एकरी रु.४.०० लक्ष देण्यात यावे.

iii) जिल्हाधिकारी यांनी या अनुषंगाने प्रस्ताव तयार करुन केपी.सी.एल. कडे पाठवावा.

२) प्रकल्पग्रस्तांना नोकरी देणे.

i) प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबातील एका व्यक्तीला खाण विकास चालकाच्या (Mine development operator) आस्थापनेवर नोकरी देण्यात यावी प्रत्येक प्रकल्पबाधित कुटूंबातील एका व्यक्तीला खाण विकास चालकाच्या आस्थापनेवर घेण्यात आल्याची व त्यांना प्रोव्हीडंट फंड इएसआय, ग्रॅच्युईटी, बोनस आणि रजा देण्यात येत असल्याची के.पी.सी.एल. ने खात्री करावी.

ii) मजूरांना वेळोवेळी सुधारित महाराष्ट्र किमान वेतन नियमाप्रमाणे वेतन देण्यात येईल.

iii) जर प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देता आली नाही. तर नोकरीच्या ऐवजी रु.५.०० लक्ष के.पी.सी.एल. मार्फत प्रकल्पग्रस्त कुटूंबाला देण्यात यावे.

३) i) कुडराला या गावाचे यापूर्वी निश्चित केलेल्या जागेवरती पुनर्वसन करण्यात यावे.

ii) संपादित क्षेत्रामध्ये जर प्रकल्पग्रस्ताची रहिवाशी जमीन गेली असेल आणि त्याची पुनर्वसित प्रकल्प जागेत जाण्याची इच्छा नसेल तर त्याला प्रती कुटूंब ५ लाखाची भरपाई देण्यात यावी.

iii) जिल्हा प्राधिकरण आणि प्रकल्पबाधितां समवेत कुटूंबामध्ये पुनर्वसनाबाबत दैनंदिन समन्वय साधण्यासाठी चंद्रपूरमध्ये के.पी.सी.एल. मार्फत नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

iv) शिल्लक राहिलेल्या अतिरिक्त कुटूंबाबाबत उप विभागीय अधिकारी यांच्या चौकशी अहवालानुसार ११ कुटूंबापेक्षा अधिक कुटुबाची वाढ करण्यात येऊ नये.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, जांभूळवाडी, कोळेवाडी या वाड्यांना गावठाणाचा दर्जा देण्याबाबत**

**(६) ३३२४६ (२३-१२-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, जांभूळवाडी, कोळेवाडी या वाड्यांना महसुली गावे म्हणून घोषित करण्यात आले असतांना गावठाणाचा दर्जा देण्यात आले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावठाणाचा दर्जाच नसल्यामुळे शेतकरी वर्ग नाराज असून गावठाणाचा दर्जा न मिळाल्यामुळे स्थानिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वाड्यांना गावठाणाचा दर्जाच नसल्याने कोणत्याच सुविधा मिळत नाहीत, बांधकामांचे प्लान पास होत नाहीत, यामुळे घरांच्या संख्येत वाढ होत असतांना अनधिकृत बांधकामांमध्ये वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून चौकशी केली आहे काय चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सरपंच, ग्रामपंचायत मांगडेवाडी यांनी मांगडेवाडी या गावाला गावठाण दर्जा मिळणेबाबत दिनांक 10.02.2015 रोजी जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. तथापि, गुजर-निंबाळकरवाडी, जांभूळवाडी, कोळेवाडी या वाड्यांना गावठाणाचा दर्जा देणेबाबत प्रस्ताव प्राप्त नाही.

(४) मौजे मांगडेवाडी या गावासाठी दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव उप विभागीय अधिकारी हवेली व तहसिलदार हवेली यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांचे तांत्रिक अभिप्राय प्राप्त करुन घेण्यात आले आहेत. त्यानुसार मांगडेवाडी गावास गावठाणाचा दर्जा देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, उर्वरित गावांचेही प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा फाजलपूर (ता.जि.अमरावती) येथील पुनर्वसन मौजा नांदुरा लष्करपूर इ-क्लास जमीनीवर करण्याबाबत**

**(७) ३८१५९ (१८-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा फाजलपूर (ता.जि.अमरावती) येथील पुनर्वसन मौजा नांदुरा लष्करपूर येथील इ-क्लास जमीनीवर करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी अमरावती निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीअंती लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनानुसार फाजलपूर (ता.जि.अमरावती) येथील पुनर्वसन मौजा नांदुरा लष्करपूर इ-क्लास जमिनीवर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, तहसिलदार अमरावती यांचे स्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे.

(३) मौजा नांदूर लष्करपूर येथे पुनर्वसनाकरिता नागरिकांशी चर्चा करण्यात आली असून त्याबाबत जमिनीची मोजणी करुन ले-आऊट तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एसटी महामंडळाच्या सिंधुदुर्ग विभागात पर्यवेक्षीय पदासह चालकांची २०० पदे रिक्त असल्याबाबत**

**(८) ४००९१ (२८-०४-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग एसटी महामंडळाच्या विभागात पर्यवेक्षीय पदासह चालकांची २०० पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने रिक्त पदे त्वरित भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१६) :**(१) नाही.

(२) माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये एकूण ३९६ नियते चालविण्याकरीता ९१५ चालकांची आवश्यकता होती. त्यानुसार ८६१ चालक उपलब्ध होते व ५४ चालकांची पदे रिक्त होती. तसेच पर्यवेक्षकीय प्रवर्गातील एकूण ६९ पदे मंजूर पदांपैकी ४३ कर्मचारी कार्यरत व २६ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याची बाब राज्य परिवहन महामंडळच्या कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वाघदरा (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील गुंजवणी-चापेट प्रकल्पातील बुडीत प्रकल्पाबाधीतांना संपादीत केलेल्या जमीनीपोटी निवासी भूखंड देणेबाबत**

**(९) ४२७२६ (२८-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघदरा (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील गुंजवणी-चापेट प्रकल्पातील बुडीत प्रकल्पाबाधीतांना संपादीत केलेल्या जमीनीपोटी निवासी भूखंड देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०८-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिल्याचे आढळून येत नाही.

मौजे वाघदरा, ता.वेल्हे येथील या पावसाळ्यात बुडीत होऊ शकतील अशा प्रकल्पग्रस्ताना जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांचेकडील दि.२७.५.२०१६ च्या आदेशान्वये मौजे आडवली, ता.वेल्हा येथे भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील द्राक्ष उत्पादकांना २० टक्के व्हॅट आणि १६ टक्के प्रोत्साहनासाठी अनुदान देण्याची मागणी**

**(१०) ४३६९७ (२८-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिक संकटामुळे टेबल द्राक्ष उत्पादक आर्थिक अडचणीत आले असल्याने त्या उत्पादकांना वाईन द्राक्षाचा उपाय शासनाने आणला मात्र बाजारासाठी शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथे द्राक्षाचे उत्पादन जास्त असल्याने वाईन उत्पादकांना २० टक्के व्हॅट आणि १६ टक्के प्रोत्साहन भत्त्यासाठी अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०८-२०१६)** :(१) द्राक्ष प्रक्रिया उद्योग धारण २००१ नुसार शासनाने, राज्यातील द्राक्षावर आधारीत वाईन उद्योगास प्रोत्साहन म्हणून शासन निर्णय, उद्योग विभाग, दि.३१.८.२००९ अन्वये, दि.१.८.२००९ पासून राज्यातील वाईन उत्पादकांना राज्यामध्ये उत्पादीत केलेल्या व राज्यामध्ये अंतिमत: विक्री झालेल्या वाईन विक्रीवर अनुज्ञेय असलेला २० टक्के मुल्यवर्धित कर (व्हॅट) भरल्यास त्यापैकी १६ टक्के कराचा परतावा प्रोत्साहन म्हणून देण्याबाबत निर्णय झालेला आहे.
(२) राज्यामध्ये वाईन उत्पादक उद्योग घटकांनी भरलेल्या २० टक्के मुल्यवर्धित कराच्या १६ टक्के परतावा प्रोत्साहन अनुदान म्हणून शासनाकडून वितरीत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई गोरेगाव पूर्व आरे वसाहती अंतर्गत रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) ४४१९५ (०५-०५-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोरेगाव पूर्व आरे वसाहती अंतर्गत असलेल्या सर्व रस्त्यांमध्ये असंख्य खड्डे पडून रस्त्याची दूरावस्था झाल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नादुरुस्ती रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व त्याकरीता किती रुपये निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे,
(३) असल्यास, शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून वसाहतीतील किती अंतर्गत रस्त्याची कामे करण्यात आली आहे व अद्याप किती रस्त्यांची कामे करणे बाकी आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-११-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) पावसाळ्यात रस्त्यावर पडलेले खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्वरीत बुजविण्यात आले असून रस्ता वाहतूकीस योग्य करण्यात आला आहे. २४०४ दुग्धव्यवसाय विकास विभाग या लेखाशिर्षाखाली उपलेखाशिर्ष २४०४ ०७०६ सन २०१५-१६ करीता रु.९३६.८८ लक्ष एवढ्या प्राप्त निधीमधून रु. ५,१८,३९,९७२/- इतर निधी खर्च झाला आहे. सन २०१६-१७ करीता रु.१५०.०० लक्ष निधी उपलब्ध झाला असून प्राप्त निधीमधून अद्यापपर्यंत रु.८,९६,४०६/- खर्च झालेला आहे.
(३) आरे दुग्धवसाहतीमधील एकूण ४४.४५ कि.मी. लांबीच्या अंतर्गत रस्त्यापैकी साधारण ८.०० कि.मी. लांबीच्या अंतर्गत रस्त्यांचे पुनर्बांधणीचे काम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे यांचे मार्फत करण्यात आले असून उर्वरित लांबी मधील रस्त्याचे पुर्णपृष्टीकरण व काही नवीन रस्ता बांधणीचे काम त्यांचे स्तरावर करावयाचे प्रस्तावित आहे.

(४) लेखाशिर्ष २४०४ दुग्धव्यवसाय विकास विभागामार्फत असलेली इमारत पाणी पुरवठा व अंतर्गत रस्ते या कामासाठी एकत्रित निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे यांचेकडे उपलब्ध होत असतो, उपभोक्ता आवश्यकतेनुसार व सूचनेनुसार रस्ता संबंधीची तातडीची कामे हाती घेऊन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे यांचे मार्फत कामे पुर्ण करण्यात येतात.

---

**अचलपूर मतदार संघातील मौजा बोरगाव पेठ हे गाव पूर्णत: बुडीत क्षेत्र घोषित करण्याबाबत**

**(१२) ४५०२० (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर मतदार संघातील वासनी मध्यम प्रकल्पांतर्गत अंशत: बुडीत क्षेत्रात जाणारे मौजा बोरगाव पेठ हे गाव पुर्णत: बुडीत क्षेत्रामध्ये समाविष्ट करुन गावाचे पुर्नवसन करण्याबाबत स्थानिक विसस अचलपूर यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी मा.मंत्री महसूल यांचेकडे लेखी पत्र देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर बॅक वॉटर मुळे पूर्ण गाव बुडण्याची शक्यता निर्माण झाली आहे व त्यामुळे नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संपूर्ण गाव बुडीत क्षेत्र घोषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१६) :**(१) होय, स्थानिक विधानसभा सदस्यांनी दि.४ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.

(२) हे खरे नाही. बोरगाव पेठ हे गाव वासणी मध्यम प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येत असुन धरणाच्या बुडीत क्षेत्रामध्ये कोणतीही जमिन जात नाही. सदर गावातील केवळ २५ टक्के घरे धरणामुळे बाधीत क्षेत्रात येत आहेत. प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियमातील तरतुदी नुसार ७५ टक्के पेक्षात अधिक शेती व घरे बाधित होत असल्यास त्या गावाचे पुर्णत: पुनर्वसन करण्यात येते. बोरगाव पेठ हे गाव पुर्णत: प्रकल्पबाधित नाही. या गावातील उर्वरीत तलांक व नवीन गावठाणाचा तलांक एकच आहे. तसेच प्रत्यक्षत धरणाच्या तलांकापासून एक मीटर पर्यंत बॅक वाटरसाठी समास ठेवण्यात आला असून सदर गावाचा उर्वरीत भाग हा दोन ते तीन मीटर उंचीवर आहे. त्यामुळे सदर गाव बॅक वाटरने पाण्याखाली जाण्याची शक्यता नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने एसटी सेवेसाठी स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावे सात योजना सुरु करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१३) ४६२८२ (२८-०४-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने एसटी सेवेसाठी स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावे सात योजना सुरु करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सात योजनांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, ह्या योजना केव्हापासून अंमलात येणार असून या योजनेवर किती खर्च अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१६) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या स्तरावर स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावे ४ योजना सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळांतर्गत कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांच्या दि.०१.०४.२०१६ रोजी व त्यानंतर जन्मणाऱ्या कन्येकरीता हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख्य बाळासाहेब ठाकरे कन्यादार योजना, राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवाशांकरिता हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात सहाय्यता निधी योजना, राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अतिविशेषोपचार रुग्णालय योजना व ए.आय.सी.टी.ई. चे (All India Council for Technical Education) निकषानुसार हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मोटार वाहन अभियांत्रिकी महाविद्यालय या ४ योजना सुरु करण्याच्या आवश्यकतेनुसार शासन मान्यतेच्या अधीन राज्य परिवहन स्तरावर निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने पात्र उमेदवारांना चालक परवाना देण्याबाबत**

**(१४) ४६४०७ (२८-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, यांनी दिनांक ११ मे, २०१५ रोजी ब्रम्हपुरी येथे चालक परवाना शिबिराचे आयोजन केले होते परंतु आठ महिन्याचा कालावधी लोटून सुध्दा अद्यापही मात्र उमेदवारांना चालक परवान्याचे वाटप करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ब्रम्हपुरीतील पात्र उमेदवारांना चालक परवाना कधीपर्यंत प्राप्त होणार आहे, तसेच सदर शिबिरामुळे नागरिकांची चालक परवान्यासाठी होणारी आर्थिक गैरसोय कमी करण्यास शिबिर जिल्हयातील दुर्गम भागात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०९-२०१६) :**(१), (२) व (३) नागरिकांची चालक परवान्यासाठी होणारी गैरसोय टाळण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही, वरोरा, चिमूर, गडचांदूर, नागभीड, मूल, गोंडपिंपरी, पोभुर्णा इ. ठिकाणी शिबिर कार्यालयांचे आयोजन करण्यात येते.

सदर प्रकरणी दि. ११.०५.२०१५ रोजी ब्रम्हपूरी येथे आयोजित शिबिर कार्यालयात काही उमेदवारांची चाचणी घेऊन पुढील कार्यवाहीसाठी कागदपत्रे संबंधित ड्रायव्हिंग स्कूलच्या कर्मचाऱ्यांमार्फत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे पाठविले असता, कागदपत्रे पोहचविण्यास संबंधिताकडून उशीर झाला, सदर प्रकरणातील पात्र उमेदवारांना पक्की अनुज्ञप्ती दि. १९.०१.२०१६ रोजी पोष्टाने पाठविण्यात आली आहे.

शिबिर कार्यालयात चाचणी घेण्यात आलेल्या पात्र उमेदवांराना त्वरीत वाहन अनुज्ञप्ती मिळण्यासाठी खाजगी व्यक्तींकडे कागदपत्रे सोपवू नयेत. अन्यथा, कडक कारवाई केली जाईल अशा सूचना सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांना निर्गमित केलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र व राज्य शासनाच्या हमीभावातील तफावत दूर करुन तफावतीची रक्कम शेतकऱ्याला बोनस म्हणून देण्याबाबत

**(१५) ४६५७७ (२७-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊसाप्रमाणे साखरेला हमीभाव मिळण्याच्या धर्तीवर रुई, दाळ, तांदूळ या शेतीपिकांना हमीभाव मिळणे व केंद्र आणि राज्य शासनाच्या हमीभावातील तफावत दूर करुन तफावतीची रक्कम शेतकऱ्याला बोनस म्हणून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधीनी राज्य शासनाकडे लेखी पत्राद्वारे अनेक वेळा मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी राज्याच्या मुख्य सचिवांना लेखी पत्र देऊन याबाबत मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, ५०% नफा धरुन हमीभावांची शिफारस आणि केंद्र व राज्यातील हमी भाव तफावतीची रक्कम शेतकऱ्यांना बोनस म्हणून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०३-१२-२०१६)** :(१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधीकडील दि.०८/०९/२०१५ चे पत्र मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केले असून त्याचा आशय हा दि.३१/०७/२०१५ चे पत्रादवारे मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (कृषी) महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेल्या पत्रानुसारच आहे. त्यामध्ये नमुद केल्यानुसार "ऊसाप्रमाणे साखरेला हमीभाव मिळण्याच्या धर्तीवर रुई, दाळ, तांदूळ या शेतीपिकांना हमीभाव मिळण्याची शिफारस करणे" या विषयाशी संबंधित आहे.

किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. किमान आधारभूत किंमती जाहिर केलेल्या पिकांमध्ये कापूस, तरु, मुग, उडीद, हरभरा, धान व ऊस या शेतीमालांचाही समावेश आहे.

साखर, रुई, विविध दाळी आणि तांदुळ हे शती मालावर प्रक्रिया करुन तयार केलेले उत्पादन असल्याने, या प्रक्रिया करुन तयार केलेले उत्पादन असल्याने, या प्रक्रिया केलेल्या शेतमाल उत्पादना करिता राज्य शासन केंद्र शासनाकडे किमान आधारभूत किंमती प्रस्तावित करीत नाही तसेच केंद्र शासन देखील प्रक्रिया केलेल्या शेतमाल उत्पादनाकरिता किमान आधारभूत किंमती जाहीर करीत नाही.

त्याअनुषंगाने संबंधित लोकप्रतिनिधीना मा.मंत्री (कृषी) यांच्या स्वाक्षरीने दि.२४/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये माहिती कळविण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यभरात तंत्र शिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून रोजगारभिमुख शिक्षण व प्रशिक्षण तसेच रोजगार विषयक कार्यक्रम राबविण्याबाबत

**(१६) ४६७३५ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात तंत्र शिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून अल्पसंख्यांकांच्या सर्वांगीण विकासाकरिता किमान कौशल्यावर आधारित रोजगारभिमुख शिक्षण व प्रशिक्षण तसेच रोजगार विषयक कार्यक्रम कार्यान्वित करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक समाज धुरिणांनी, समाजसेवकांनी तसेच जनप्रतिनिधीबरोबरच तंत्र शिक्षणातील अल्पसंख्यांक विध्यार्थ्यांनी मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.मंत्री (तंत्र शिक्षण), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या / प्रादेशिक विभागांच्या संबंधित प्रशासनाधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखीनिवेदनादवारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती अल्पसंख्यांकांच्या सर्वांगीण विकासाकरिता किमान कौशल्यावर आधारित रोजगारभिमुख शिक्षण व प्रशिक्षण तसेच रोजगार विषयक कार्यक्रम कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील बेरोजगार उमेदवारांना निरंतर प्रशिक्षण योजना / तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ / मुक्त विद्यापीठ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना दि.४ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे, ही योजना संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्यामार्फत राबविली जाते.

---

**राज्यात अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी डॉ. जाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना सुधारीतपणे कार्यान्वित करण्याबाबत**

**(१७) ४६७३९ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी डॉ. जाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना सुधारीतपणे कार्यान्वित करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक समाजातील जनप्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्रातील धुरिणांनी तसेच विविध प्रादेशिक विभागातील उच्च/व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थ्यांनी मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या/प्रादेशिक विभागांच्या मुख्याधिकार्यांकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखीनिवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती राज्यात अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी डॉ. जाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना सुधारीतपणे कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर योजना सुधारित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी प्री मॅट्रिक, पोस्ट मॅट्रिक आणि मेरीट-कम-शिकवा व कमवा याच्या धर्तीवर शिष्यवृत्ती करण्याबाबत**

**(१८) ४६७४० (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी प्री मॅट्रिक, पोस्ट मॅट्रिक आणि मेरीट-कम-शिकवा व कमवा याच्या धर्तीवर शिष्यवृत्ती करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक समाजातील जनप्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्रातील धुरिणांनी तसेच विविध प्रादेशिक विभागातील उच्च/व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थ्यांनी मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या/प्रादेशिक विभागांच्या मुख्याधिकाऱ्यांकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती राज्यात अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी प्री मॅट्रिक, पोस्ट मॅट्रिक आणि मेरीट-कम-शिकवा व कमवा याच्या धर्तीवर शिष्यवृत्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१६) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही. तथापि शासनाकडून मेरीट-कम-शिकवा व कमवा ही योजना अल्पसंख्यांक विकास विभागाकडून राबविण्यात येत नाही. राज्य शासनामार्फत केंद्र शासनाची अल्पसंख्यांकासाठी प्री मॅट्रीक, पोस्ट मॅट्रीक आणि मेरीट-कम-मीन्स व राज्य शासनाची उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या व १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

---

**हिंगोली जिल्हयातील अवैध दारु खरेदी विक्रीला निर्बंध आणण्याबाबत**

**(१९) ४६९०७ (२८-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील अवैध दारुवर निर्बंध आणण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभाग वव पोलीस प्रशासनान एकत्र कारवाई करण्याचे आदेश विशेष पोलीस निरिक्षकांनी यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती हिंगोली जिल्हयातील अवैध दारु खरेदी विक्रीला निर्बंध आणण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीसांनी कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०८-२०१६) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व.सु.) पोलीस महासंचालक यांच्या दि. १४/९/२०१५ तसेच आयुक्त राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या दि. २२/०९/२०१५ च्या परिपत्रकान्वये पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या मार्फत संयुक्तरित्या कारवाई करण्यात येते.

(३) राज्य उत्पादन शुल्क, विभागामार्फत हिंगोली जिल्ह्यात अवैध दारु खरेदी विक्री विरुध्द डिसेंबर, २०१५ ते एप्रिल, २०१६ पर्यंत एकूण १२७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच पोलीस विभागाच्या मदतीने एकूण १८ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे पोलीस विभागाने माहे सप्टेंबर, २०१५ ते माहे मे, २०१६ पर्यंत एकूण ३५७ गुन्हे दाखल केले आहेत. अवैध दारुविक्रीला आळा घालण्यासाठी विशेष मोहिमा राबवून संयुक्तपणे ठोस कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन बळकावणे, कमी भावात विक्री केल्याबाबतच्या समितीबाबत**

**(२०) ४७०६५ (२८-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन बळकावणे, कमी भावात विक्री करणे याबाबत मा.औकाफ मंत्री यांनी जिल्हा स्तरावर समिती गठीत केली जाईल असे सांगूनही अद्याप समिती गठित करण्याबाबतची कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा स्तरावर समित्या गठीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) व (२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रवाशांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या आगारात सीसीटीव्ही बसविण्याबाबतचा प्रस्ताव**

**(२१) ४७६२२ (२८-०४-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या आगार, तसेच स्थानकातील कामाकाजावर देखरेखीसाठी एसटी स्थानक आणि आगारात सीसीटीव्ही बसविण्याचा प्रस्ताव महामंडळाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी सल्लागारांची नियुक्ती केली असून सल्लागारांनी आपला अहवाल महामंडळास दिला आहे काय,
(३) असल्यास, त्यावर कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, याप्रस्तावावर शासनाने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१६) :**(१), (२), (३) व (४) केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट अॅण्ड हायवे (MORTH) भारत सरकार यांच्याकडून प्रकल्प निधी मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) (DPR) तयार करण्याकरिता मध्यवर्ती रस्ते वाहतूक संस्था, पुणे (CIRT) Pune यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सीआयआरटी (CIRT) यांनी सादर केलेल्या अहवालात राज्य परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये CCTV बसविण्याचा समावेश आहे. सदर संस्थेद्वारा प्राप्त झालेल्या अहवालाच्या अंमलबजावणीकरीता मे.केपीएमजी यांना प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले असून सदरची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सुसरी-पेंढरी-मारेगाव (ता.झरीजामणी, जि.यवतमाळ) मार्गावरील बससेवा सुरु करण्याबाबत

**(२२) ४८१४५ (२८-०४-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुसरी-पेंढरी-मारेगाव (ता.झरीजामणी,जि.यवतमाळ) या मार्गावर गेल्या काही वर्षापूर्वी परिवहन महामंडळाची बससेवा सुरु होती, मात्र ही बसफेरी बंद झाल्यामुळे प्रवाशांना खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागत असल्याने मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही बसफेरी सुरु करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू सुसरी-पेंढरी-मारेगाव मार्गावरील बससेवा सुरु करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१६) :**(१), (२) व (३) सदर मार्गावर प्रवाशी प्रतिसाद कमी मिळाल्याने व सदर फेऱ्यांचे भारमान अतिशय कमी असल्याने सदर फेरी बंद ठेवण्यात आली

होती. तथापि, दि.०१.०५.२०१६ पासून सकाळी ०८.०० व दुपारी १४.०० वाजता पांढरकवडा येथून सुसरी-पेंढरी-मारेगांव नियमित फेरी सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वक्फ मालमत्तासंबंधीचे दावे चालविण्यासाठी त्रिसदस्य न्यायाधिकरण नेमण्याबाबत**

**(२३) ४८२६७ (२८-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वक्फ मालमत्तासंबंधीचे दावे चालविण्यासाठी एक सदस्यीय न्यायाधिकरणाऐवजी त्रिसदस्यीय न्यायाधिकरण नेमण्याची तरतुद करणारा सुधारित वक्फ कायदा लागू होवून दोन वर्षे उलटली तरी अशी नवी न्यायाधिकरणे अद्याप स्थापन करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व राज्यांनी त्रिसदस्यीय न्यायाधिकरण येत्या ४ महिन्यात स्थापन करण्याची शिफारस मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे डिसेंबर, २०१५ वा त्या दरम्यान केली हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय न्यायाधिकरण नेमण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१), (२) व (३) त्रि-सदस्यीय वक्फ न्यायाधिकारणाची स्थापना करण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(४) वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ८३ येथील सुधारित तरतुदींनुसार त्रि सदस्यीय वक्फ न्यायाधिकरणाची स्थापना करण्याची कार्यवाही सुरु आहे. कलम ८३ (४-ए) येथील तरतुदीनुसार न्यायाधिकरणावर अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्ती विषयीच्या अटी व शर्ती तसेच त्यांना अनुज्ञेय वेतन व भत्ते, याबाबी राज्य शासनाने विहित करावयाच्या आहेत. त्यानुसार शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. वक्फ २०१५/प्र.क्र. ५७/का.४, दि. २८.१२.२०१५ अन्वये "महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण (अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती व सेवाशर्ती) नियम, २०१५" ही नियमावली राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या एक सदस्यीय न्यायाधिकरणाच्या पिठासीन अधिकारी पदावरील व्यक्तीची प्रस्तावित त्रि-सदस्यीय न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष पदावर नियुक्त करण्याच्या प्रस्तावास मा.मुख्य न्यायाधिश, मुंबई उच्च न्यायालय, यांची सहमी प्राप्त करुन घेण्यात आलेली आहे. राज्य वक्फ न्यायाधिकरणाला आता दिवाणी न्यायालयाचा दर्जा प्रदान करण्यात आलेला असल्याने त्यानुसार सुधारित आस्थापना व पदनिर्मितीचा शासन निर्णय दि. ०३.०८.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चारचाकी वाहनांच्या काचेला काळ्या रंगाची फिल्म लावलेली आढळल्यास प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे कारवाई करण्याबाबत**

**(२४) ४८६८९ (२८-०४-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारचाकी वाहनांच्या काचेला काळ्या रंगाची फिल्म लावलेली आढळल्यास प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे कडक कारवाई करण्यात येईल असे आदेशाचे परिपत्रक काढण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाचे उल्लंघन करुन धुळ्यातील प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय लांडे यांच्या सरकारी वाहनांच्या मागील बाजूस दवाज्याच्या काचेवर गर्द काळया रंगाची फिल्म लावल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकाऱ्यांनीच नियमांचे केलेल्या उल्लंघनाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खटाव तालुक्यातील (जि.सातारा) बुध, सिध्देश्वर, कुरोळी, विखळे, मिनसोड हिस्कल येथील अवैध दारुधंदे बंद करण्याबाबत**

**(२५) ५२०८० (२८-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव तालुक्यातील (जि.सातारा) बुध, सिध्देश्वर, कुरोळी, विखळे, मिनसोड हिस्कल येथे महिलांनी दारुबंदी केली होती परंतु प्रशासनामुळे सध्या येथे अवैध दारुधंदे जोमाने सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, खटाव तालुक्यातील (जि.सातारा) वडूज येथील लोकवस्तीमध्ये असलेले देशी दारु दुकान हटविण्याची मागणी येथील महिलांनी केली आहे याबाबत अधीक्षक, राज्य उत्पादक शुल्क, जिल्हाधिकारी व तहसिलदारांकडे निवेदने देण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०८-२०१६)** :(१) खटाव तालुक्यातील (जि.सातारा) सिध्देश्वर, कुरोळी, विखळे, निमसोड येथे महिलांनी दारुबंदी केलेली आहे. तथापि बुध, हिस्कल या गावांमध्ये दारुबंदी नाही. सन २०१५ मध्ये अवैध दारु धंद्यावर भरारी पथकाकडून कार्यवाही करुन तीन गुन्ह्यांची नोंद केलेली आहे.

(२) व (३) होय.

जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांच्या दि. १३/०५/२०१६ च्या आदेशान्वये वडूज येथील सीएल-३ अनुज्ञप्ती क्र. ६७ बंद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा टाकळी (ता.जि.भंडारा) या पुनर्वसीत गावातील विविध समस्या सोडविण्याबाबत**

**(२६) ५२३३६ (२८-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा टाकळी (ता.जि.भंडारा) या पुनर्वसीत गावातील विविध समस्या सोडविण्याबाबत लोकप्रतिनीधींना दिनांक २३ फेब्रुवारी,२०१६ रोजी मा.मंत्री मदत व पुनर्वसन यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मौजा टाकळी ता.जि.भंडारा या पुनर्वसीत गावातील विविध समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) नागरी सुविधांचे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण करिता जिल्हा परिषद यंत्रणा व कार्यकारी यंत्रणा यांचेकडून संपूर्ण पाहणीकरण्यात आली व शासन निर्देशानुसार गावठाणातील अंतर्गत दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करुन मौजा टाकळी (पुनर्वसन) गावठाण चे नागरी सुविधा देखभाल व दुरुस्ती करिता रु. १,५१,७९,९४९/- बाबत चे अंदाजपत्रक तयार करुन जि.प.कडे सादर करण्यात आली. याकरिता निधी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांचे कडून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. संबंधित यंत्रणेच्या मदतीने गावातील नागरी सुविधा व दुरुस्तीचे कामे तात्काळ पूर्ण करण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

तसचे भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत मौजा टाकळी हे गाव बाधीत झाल्याने या गावाचे पुनर्वसन मौजा लावेश्वर चे हद्दीमध्ये करण्यात आले. सदरचे नवीन पुनर्वसन गावठाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ४ नुसार दिनांक १ ऑगस्ट, २०१४ पासून जुनी टाकळी (पुनर्वसन) या नावाने नविन महसूलीगाव म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वेळेचे नियोजन करण्याबाबत

**(२७) ५२७४३ (२८-०४-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सध्या वाहनांच्या संख्येत वाढ होत असून मुंबईत एका दिवसाला ५९१ नव्या वाहनांची नोंद प्रादेशिक परिवहन कार्यालयात होत असल्याचे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहनांमध्ये रिक्षा-टॅक्सी या सार्वजनिक वाहनाऐवजी खासगी चारचाकी वाहनांची संख्या अधिक असल्याचे आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दररोज सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १० पर्यंत होत असलेली मुंबईतील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वेळेचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई (मध्य) व (पूर्व) कार्यालयात रिक्षा-टॅक्सी या सार्वजनिक वाहनाऐवजी खाजगी चारचाकी वाहनांची संख्या अधिक आहे. परंतु मुंबई (पश्चिम) कार्यालयात रिक्षा-टॅक्सी या सार्वजनिक वाहनांची संख्या खाजगी चारचाकी वाहनांपेक्षा अधिक आहे.

(३) मुंबई शहरातील वाहतुकीचे नियमन व नियंत्रण हे काम प्रामुख्याने वाहतूक पोलीस विभागामार्फत करण्यात येते. मुंबई शहरातील रस्ते रुंदीकरण, उडाणपूल व सागरी मार्ग उभारुन वाहतूकीचा ताण कमी करणे, सार्वजनिक प्रवासी वाहतूक उपलब्ध करणे इत्यादी बाबी हाताळल्या जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी भागीदाराची विशेष कंपनी स्थापन करण्यात येणार असल्याबाबत

**(२८) ५२९९३ (१७-०५-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन, गुजरात शासन व रेल्वे मंत्रालय यांच्या भागीदाराची विशेष कंपनी स्थापन करण्यात येणार असून या प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी बँक सुमारे ८० हजार कोटी रुपये कर्ज देणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर रेल्वे प्रकल्पाबाबत शासनाने कोणते नियोजन केले वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) मुंबई अहमदाबाद या ५०८ कि.मी मार्गावर बुलेट ट्रेन प्रकल्प उभारणीच्या प्रस्तावास केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने मान्यता दिली आहे. प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ९७६३९ कोटी इतकी आहे. प्रकल्पावर १२ स्थानके प्रस्तावित आहेत. गाड्यांची प्रस्तावित गती ३२० कि.मी. प्रती तास प्रस्तावित आहे. प्रकल्प उभारणीचा अपेक्षित कालावधी ७ वर्षे आहे. प्रकल्प अंमलबजावणीसाठी केंद्रीय रेल्वे मंत्रालय, गुजरात शासन व महाराष्ट्र शासन यांची S.P.V. कंपनी स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे सदर प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील डॉ. पंजाबदाराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या सात कृषि विज्ञान केंद्रातील ८० टक्के शास्त्रज्ञ, कर्मचाऱ्यांच्या जागा भरण्याबाबत**

**(२९) ५४५९८ (२०-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्हयातील शेतक-यांना कृषि अडचणीविषयक अचूक माहिती व शंकांच्या निरसनासाठी राज्यात कृषि विज्ञान केंद्राची (केव्हीके) स्थापना करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु विदर्भातील डॉ. पंजाबदाराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या सात कृषि विज्ञान केंद्रातील ८० टक्के शास्त्रज्ञ, कर्मचा-यांच्या जागा रिक्त आहेत हे खरे आहे काय,

(३) तसेच जे कर्मचारी आहेत त्यांना गेल्या दोन महिन्यांपासून पगारही मिळाला नाही हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती विदर्भातील डॉ. पंजाबदाराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या सात कृषि विज्ञान केंद्रातील ८० टक्के शास्त्रज्ञ, कर्मचाऱ्यांच्या जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२९-११-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) नाही.

सदर कृषी विज्ञान केंद्रातील कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांपासूनचे वेतन त्यांना मिळालेले आहे. सदर कृषी विज्ञान केंद्रातील कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी केवळ विलंब झाला कारण भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने दिलेल्या वेतनश्रेणी व ग्रेड-पे मधील तफावत प्रथम दुर करण्यात आली व तद्नंतर लगेच माहे जून, २०१६ मध्ये दोन्ही महिन्यांचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(४) व (५) भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, यांच्या निकषाप्रमाणे कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत कृषि विज्ञान केंद्रातील सर्व पदे नव्याने भरण्याची कार्यवाही डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी पूर्ण केलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बदलापूर (जि.ठाणे) ते मुंबई अशी वातानुकुलीत बस सेवा सुरु करणेबाबत**

**(३०) ५४९५० (२४-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर, नेरळ, कर्जत, कल्याण या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील रेल्वे सेवेच्या व्यतिरिक्त पर्यायी वाहतूक सेवा उपलब्ध नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी बदलापूर ते मुंबई अशी वातानुकुलीत बस सेवा सुरु करणेबाबत मा.परिवहन मंत्री महोदयांकडे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती बदलापूर ते मुंबई अशी वातानुकुलीत बस सेवा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) बदलापूर ते मुंबई अशी वातानुकूलित बससेवा सुरु करण्याबाबत मागणी केलेली असून त्या मागणीच्या अनुषंगाने तपासणी केली असता बदलापूर ते मुंबई मार्गावर मध्य रेल्वेच्या दैनंदिन ५६ फेऱ्या उपलब्ध आहे. तसेच उपनगरीय रेल्वेने बदलापूर ते मुंबई या मार्गासाठी जलद लोकलने १ तास २० मिनिटे तर धिम्या गतीच्या लोकने २ तास १० मिनिटे एवढा अवधी लागतो. तर राज्य परिवहन बसने या मार्गासाठी २ तास ३० मिनिटे व ३ तास एवढा वेळ लागतो. त्यामुळे या सेवेस पुरेसा प्रवासी प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या निम्न कृषि शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या खाजगी कृषि तंत्रनिकेतर अभ्यासक्रमातील एका विषयाचा पेपर फुटल्याबाबत**

**(३१) ५५०७४ (२०-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या निम्न कृषि शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या खाजगी कृषि तंत्रनिकेतर अभ्यासक्रमातील एका विषयाचा पेपर दिनांक २३ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास फुटला हे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०४-१२-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द दि.२ नोव्हेंबर, २०१६ रोजी पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर, अमरावती येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील भोर एसटी आगाराकडून घेतला जाणारा टोल माफ करण्याबाबत**

**(३२) ५५६७९ (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात लांबच्या फेऱ्या कमी, दुर्गम डोंगरी गावांमुळे अंतर अधिक व ग्रामीण भागात प्रवाशांची संख्या कमी त्याचबरोबर महामार्गावर महिन्याला टोलसाठी १० ते ११ लाख रुपये भरावे लागत असल्याने भोर एसटी आगाराला दिवसाला सुमारे ४० हजारांचा तर महिन्याला १२ लाख ८ हजारांचा तोटा सहन करावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोर एसटी आगाराकडून घेतला जाणारा टोल माफ करावा, म्हणून महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना भेटून भोर एसटी आगार व्यवस्थापनाने निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एसटी फायद्यात जाण्यासाठी, टोल माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) सदरचा पथकर नाका हा राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या कार्यकक्षेत येत असल्याने राज्य परिवहन महामंडळच्या बसेसला टोल सूट मिळावी म्हणून राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर पत्रव्यवहार करुन वेळोवेळी विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मृत्युमुखी पडणाऱ्या खलाशांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(३३) ५६३३० (१२-०८-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रात मासेमारी करताना मृत्यू पावलेल्या मच्छिमारांच्या वारसांना अर्थसहाय्य मिळण्याबाबतच्या ४ प्रस्तावांपैकी ३ प्रस्ताव मत्स्यजीवी सहकारी संघ नवी दिल्ली यांचेकडे केव्हा पाठविण्यात आले आहेत,

(२) सदर प्रस्तावाला मत्स्यजीवी सहकारी संघ नवी दिल्ली यांनी मंजूरी दिली आहे काय,

(३) असल्यास, केव्हा तसेच संबंधित वारसदारांना प्रत्येकी किती अर्थसहाय्य देण्यात आले आहे,

(४) अद्याप मंजुरी अथवा अर्थसहाय्य मिळाले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच त्वरीत मंजुरी मिळण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न करण्यात आल आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-११-२०१६) :**(१) मा.सदस्यांना अभिप्रेत असलेले ४ प्रस्ताव कोणत्या जिल्ह्याशी अथवा कोणत्या चार विशिष्ठ मृत मच्छिमारांशी संबंधित आहे. याचा स्पष्टपणे अर्थ बोध होत नाही. तथापि अपघात गट विमा योजना सुरु झाल्यापासून आज अखेर मुंबई विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील जिल्ह्यातील मृत मच्छिमारांचे एकूण ७९ प्रस्ताव राष्ट्रीय मत्स्यजीवी सहकारी संघ मर्या, नवी दिल्ली यांच्याकडे मंजुरीस्तव पाठविण्यात आलेले आहे. त्यापैकी राष्ट्रीय मत्स्यजीवी सहकारी संघ मर्या, नवी दिल्ली यांनी आतापर्यंत एकूण ४९ प्रस्ताव मंजूर केलेले आहेत व ६ प्रस्ताव विविध करण्यासाठी नामंजूर करण्यात आलेले आहे. उर्वरित २४ प्रस्तावापैकी २० प्रस्ताव अद्याप राष्ट्रीय मत्स्यजीवी सहकारी संघ मर्या, नवी दिल्ली यांच्याकडे मंजुरीस्तव प्रलंबित आहेत व ४ प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने त्याच्या पुर्ततेसाठी संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना कळविण्यात आलेले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदूर्ग) आनंदवाडी येथे अत्याधुनिक व सुसज्य मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याबाबत**

**(३४) ५६८२७ (१२-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आनंदवाडी येथे अद्यावत व सुसज्ज मस्त्य व्यवसाय विकास बंदर विकसीत करण्याचे शासनाने योजून ७ व्या पंचवार्षिक योजनेत सदरहू प्रकल्पाचा समावेश होवून १० व्या पंचवार्षिक योजनेंच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे योजिलेले असतानाही आजमितीस सदरहू योजनेचे काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) मुख्य अभियंता सा.बां.विभाग यांनी दिनांक १५ डिसेंबर, २००६ अनुषंगाने भाग १ च्या कामास ११ कोटी ३४ लाख २४ हजार ९१२ इतक्या किंमतीस तांत्रिक मंजूरी देण्यात आल्या नंतर सदरहू कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होवून पतन अभियंता, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २००७ रोजी कंत्राटदार मे.आ.बी.चव्हाण, मुंबई यांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ठेकेदारांनी १ हजार ६०० मीटर भरावाच्या लांबीमध्ये ४१० मीटर भरावाचे काम पूर्ण केले असून त्यासाठी ७ कोटीहून अधिक रक्कम खर्च झाली असतानाही स्थानिक ग्रामस्थांच्या आक्षेपामुळे सदरहू बंदराच्या विकासाचे काम दिनांक ८ मे, २००८ पासून संपूर्णत: ठप्प झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनुसार गावांसमोरील ५०० मीटर भाग वगळून इतरत्र बंदाराचे काम हाती घेण्याच्या दृष्टीने सी.आय.सी.इ.एफ. बंगलोर यांचेकडून सुधारीत नकाशे तयार करून घेण्यात आल्यानंतर नियोजित कामाचे सुधारीत अंदाजपत्र व नकाशे रक्कम रूपये ८१ कोटी ६२ लाख २१ हजार १५४ इतक्या रक्कमेचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू सुधारीत प्रस्ताव व नकाशाच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त झाली आहे काय,

(५) अद्यापी मान्यता प्राप्त झाली नसल्यास सदरहू मान्यता विनाविलंब मिळविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणकोणते प्रयत्न केले आहे,

(६) सदरहू प्रकल्पाच्या उभारणीच्या कामास विलंब झाल्यामुळे दिवसैंदिवस या प्रकल्पाच्या कामाच्या खर्चात चौपटीने वाढ झालेली असल्याने तसेच सदरहू प्रकल्पाचे रखडलेले काम लवकरात लवकर प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री. महादेव जानकर (१५-११-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) नाही.

(५) पतन अभियंता, पतन विभाग सिंधुदुर्ग यांचेकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) केंद्र शासनाची सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार या बांधकामास सुरुवात करण्यात येईल.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात उस पिकाबरोबर उन्हाळी भुईमूग, सूर्यफुल, मका, कडधान्य आदि पिकांचे पाण्याच्या टंचाईमुळे झालेले नुकसान**

**(३५) ५६८९० (२०-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात उस पिकाबरोबर उन्हाळी भुईमूग, सूर्यफुल, मका, कडधान्य आदि पिकांचे पाण्याच्या टंचाईमुळे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती पाण्याअभावी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२९-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) पाण्याच्या टंचाईमुळे शेतीपिकांचे व फळपिकांचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अहवालानुसार निदर्शनास आले होते. तथापि, जिल्ह्यात पाऊस सुरु झाल्याने सदर बाधित क्षेत्रातील पिक परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित शेतीमालास हमीभाव वाढवून देण्याबाबत**

**(३६) ५७३०३ (२२-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शास्वत शेतीवर उपजीविका असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित शेतीमालास हमीभाव वाढवून देण्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याबाबतची मागणी समाजसेवकांनी कृषी तज्ञांबरोबरच तसेच जनप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (कृषी व फलोत्पादन), मा. राज्यमंत्री (कृषी व फलोत्पादन), प्रधान सविव (कृषी व फलोत्पादन) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या/प्रादेशिक विभागांच्या कृषी संचालनालय बरोबरच फलोत्पादन संचालनालय विभागाच्या संबंधित प्रशासनाधिकारी यांच्याकडे दिनांक २६ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०३-१२-२०१६) :**(१) व (२) शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित शेतीमालास हमीभाव वाढवून देण्यासाठी भरीव आर्थिक तरतुद करण्यात यावी या विषयाचे शेतकरी प्रतिनिधी, समाजसेवक, कृषी तज्ञ, तसेच जनप्रतिनिधी यांची निवेदने शासन/ कृषी आयुक्तालाय तसेच प्रादेशिक व जिल्हा कार्यालयात प्राप्त झालीत, हे खरे आहे.

शेतमालाच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. प्रत्येक वर्षी पीक उत्पादन खर्च योजनेंतर्गत खरीप, रब्बी हंगाम व ऊस पिकासाठी राज्यातील चारही कृषी विद्यापीठांकडून पीक उत्पादन खर्चाच्या प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे व विविध निविष्ठांची प्रचलित भावपातळी लक्षात घेवून उत्पादन खर्चावर आधारित किंमती केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात.

केंद्र शासन राष्ट्रीय पातळीवर आधारभूत किंमत योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर करीत असते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किंमती सर्व राज्यांना लागू होतात.

शेतमालाला किमान हमी भाव वाजवी मिळावेत म्हणून राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते.

शेतकरी प्रतिनिधी, समाजसेवक, कृषी तज्ञ, तसेच जनप्रतिनिधी यांच्या शासन/ कृषी आयुक्तालय तसेच प्रादेशिक व जिल्हा कार्यालयात प्राप्त झालेल्या निवेदनाचे अनुषंगाने संबंधितांना लिखीत स्वरुपात माहिती कळविण्यात येते.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंळाने बस गाडयांच्या आसन क्षमतेमध्ये बदल करण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(३७) ५८६५६ (२४-०८-२०१६). अ‍ॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने ३०० बसगाडयांची आसन क्षमता वाढविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे तसेच नवीन बसेस सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१६) :**(१) व (२) राज्य परिवहन महामंडळाने १०० बस गाड्यांची आसन क्षमता वाढविण्याचा निर्णय घेतला असून त्याप्रमाणे १०० बसेसची आसन क्षमता वाढविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**उदगरी (जि.लातूर) येथील पशुवैद्यकीय विद्यापीठाच्या उपकेंद्रास निधी मंजुर करण्याबाबत**

**(३८) ५९७९८ (१२-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथील पशु वैद्यकीय विद्यापीठाच्या उपकेंद्राच्या मान्यतेनंतर उपकेंद्राच्या बळकटी करण्यासाठी आलेला निधी परत गेला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी परत जाण्याचे कारणे काय आहेत,
(३) असल्यास, परत गेलेला निधी उपलब्ध व्हावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यानी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करुनही निधी उपलब्ध करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, पशुवैद्यकीय उपकेंद्रासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) निधी परत गेलेला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) निधी परत न गेल्याने निधीची मागणी केली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उदगीर (जि.लातूर) येथील पशुविद्यापीठ उपकेंद्र मंजुरीनंतर या ठिकाणाचे उपकुलगुरु रिक्त ठेवलेले पद भरण्याबाबत

**(३९) ५९८०१ (१२-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथील पशुविद्यापीठ उपकेंद्र मंजुरीनंतर या ठिकाणाचे उपकुलगुरु पद रिक्त ठेवले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त ठेवलेले पद भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी शासनाकडे माहे मार्च, २०१६ मध्ये वा दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपकेंद्रावरील उपकुलगुरुचे रिक्त असलेले पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही. उपकुलगुरु हे पद मंजूर नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेवासा विधानसभा क्षेत्रात कृषी खात्यातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४०) ६०६१६ (२०-०८-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा विधानसभा मतदार संघातील कृषी विभागात कृषी अधिकारी पासून ड्रायव्हर पर्यंत सुमारे २० ते २५ पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी परिस्थिती व पेरनीचा हंगाम सुरु असुन कृषी खात्यामधील रिक्त पदामुळे कुठलेच कामाकाज होत नाही अशी तक्रार स्थानिक नागरिक, शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंबंधी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१५-१०-२०१६) :**(१) होय, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नेवासा व अधिनस्थ कार्यालयामध्ये कृषी अधिकारी ते वाहन चालक संवर्गातील एकूण १९ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही. रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे देऊन कामकाज पार पाडण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) कृषी अधिकारी (गट-ब) पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १०.७.२०१६ रोजी पूर्वपरीक्षा घेण्यात आली आहे. कृषी सेवकांची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी परीक्षा घेण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना तात्काळ जमिनीचे वाटप करणेबाबत**

**(४१) ६०८४५ (२२-०८-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना जमीनीचे वाटप व त्यांच्या वसाहतीमध्ये पायाभूत सुविधा यासह प्रकल्पग्रस्ताच्या वसाहती महसूल गांवे म्हणून घोषीत करणे व त्याच्या जमिनीमधील अतिक्रमने काढणेबाबतच्या सुचना विभागीय आयुक्त पुणे विभाग यांनी दि. ५ जून २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे झालेल्या आढावा बैठकीत दिला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील सुमारे १ हजार २५९ प्रकल्पग्रस्तांने अद्याप जमिनीचे वाटप करावयाचे आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय आयुक्तांच्या सूचनेनुसार प्रशासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-१०-२०१६)** :(१) होय.
(२) होय.
(३) कोल्हापुर जिल्हयातील चांदोली राष्ट्रीय अभयारण्य, सर्फनाला, आंबोओहोळ, नागणवाडी, धामणी, उचंगी, आदी प्रकल्पांमुळे बाधित प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करावयाचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाड्यासाठी दुष्काळी परिस्थितीवर दिर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत**

**(४२) ६१३२९ (२२-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भीषण दुष्काळ असतानाही राज्य शासनाने दुष्काळसदृश्य किंवा दुष्काळग्रस्त असे शब्द वापरुन प्रत्यक्ष दुष्काळाशी संबंधित उपाययोजना अंमलात आणण्याबाबत दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळात होरपळत असलेल्या मराठवाड्यासाठी दिर्घकालीन उपाययोजना करण्याची सुचना मा.पंतप्रधान यांनी मा.मुख्यमंत्री यांना देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने आजपावेतो दुष्काळग्रस्तांसाठी दिर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-११-२०१६)** :(१) हे खरे नाही.
महसूल व वन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.एससीवाय-२०१६/प्र.क्र.१/म-७ व शासन शुध्दीपत्रक क्र.एससीवाय-२०१६/प्र.क्र.२१९/म-७, दिनांक ११ मे, २०१६ अन्वये दुष्काळसदृश्य परिस्थिती ऐवजी "दुष्काळ" जाहीर करुन त्यानुषंगाने उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(२) व (३) महसूल व वन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.३८६/म-७ दिनांक ४ जानेवारी, २०१६ अन्वये ग्राम स्तरावर तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवर दुष्काळ निवारण समिती गठीत करण्यात आली आहे.
राज्यात सातत्याने उद्‌भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाकडून पैसेवारीच्या आधारे ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांमध्ये खरीप व रब्बी हंगामात टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करणे, जनावरांसाठी चारा छावण्या सुरु करणे, जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे रुपांतरण, वीज बीलात सुट, परिक्षा शुल्कात माफी, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती वगैरे सारख्या सोयी सुविधा जाहीर करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेततळ्यांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) ६२३४४ (१६-०७-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातुर (जि.लातूर) तालुक्यातील ६१ शेतकऱ्यांच्या शेततळ्यांचे प्रस्ताव कृषी अधिकारी यांनी तांत्रिक मंजुरी दिली नसल्याने प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने निर्णय घेऊन सदर प्रस्तावांना तात्काळ मंजूरी देण्याबाबत विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३०-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

लातुर तालुक्यातील ३२ शेततळ्यांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे.

(२) व (३) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सन २०१६-१७ च्या वार्षिक कृति आराखड्यामध्ये लातुर जिल्ह्यासाठी सामुहिक शेततळे घटकाकरिता भौतिक १०६ व आर्थिक रु. १८०.३४ लाख असा लक्षांक देण्यात आलेला आहे. त्यामध्ये इतर प्रस्तावांसह वरील प्रस्ताव विचारात घेण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहेरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील दामरचा या गावात जाणाऱ्या येण्याकरिता**
**राज्य परिवहन महामंडळाची बस नसल्याबाबत**

**(४४) ६२७३३ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील दामरचा या गावात जाणाऱ्या येण्याकरिता राज्य परिवहन महामंडळाची बस नसल्याने येथील गावकऱ्यांना खाजगी वाहनांने प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर अवैध प्रवासी वाहतूक रोखण्याकरिता तसेच या गावात एस.टी. बस सेवा सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१६) :**(१) व (२) होय.
(३) दामरची गावाला जाणारा रस्ता दुरुस्त करुन सदर मार्ग राज्य परिवहन वाहतुकीस योग्य असल्याबाबतचा दाखला देण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम खाते, गडचिरोली यांना महामंडळाद्वारे कळविण्यात आले आहे. दामरचा या गावाला जोडणारा पूल वाहून गेल्याने सद्य:स्थितीत सदर मार्गावरुन राज्य परिवहन वाहतूक करता येत नाही. मात्र छल्लेवाड या गावापर्यंत अहेरी आगाराच्या दिवसातून ३ फेऱ्या चालनात आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यात ऊस पिकांवर हुमणीचा प्रादुर्भाव तातडीने रोखण्याबाबत**

**(४५) ६२९५२ (२०-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यात ऊस पिकांवर हुमणीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे ऊसाचे फडच्या फड उदधवस्त झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तातडीने पाहणी करून ऊस पिकावर झालेला हुमणीचा प्रादूर्भाव तातडीने रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. कोल्हापुर जिल्हयात नदीकाठच्या ऊस पिकामध्ये विशेषत: खोडवा पीकामध्ये हुमणीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला आहे.
(२) हुमणी नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना मोहिम स्वरुपात एकात्मिक किड व्यवस्थापन करण्याबाबत विद्यापीठ शास्त्रज्ञ व कृषी विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच कोल्हापुर जिल्हयासाठी नाविन्यपूर्ण योजनेतून जिल्हा नियोजन समितीने ईपीएन निर्मितीसाठी ३५ लाख रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. ईपीएन कल्चर वापर करुन हुमणी नियंत्रण मोहिम प्रशासनामार्फत राबविली जात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर विभागातील बहुतांश कृषी कार्यालय भाड्याच्या जागेवर सुरू असल्याबाबत**

**(४६) ६२९६७ (२०-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील बहुतांश कृषी कार्यालय भाड्याच्या जागेवर सुरू असल्याची बाब माहे मार्च २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रामटेक उपविभागीय कृषी कार्यलयासह जिल्हयातील अनेक कृषी कार्यालयावर मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही नगरपालिकांनी कर वसुलीसाठी थेट कृषी विभागाला नोटीस बजावून काही कार्यालयांवर जप्तीची कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१५-१०-२०१६) :**(१) होय.

(२) होय. रामटेक उप विभागीय कृषी कार्यालयासह जिल्हयातील अनेक कृषी कार्यालयावर रु.६५,७९,१९७/- इतकी रक्कम भाडे, भाडेपट्टी व करापोटी थकबाकी आहे. सदर बाबींसाठी अनुदान अत्यल्प प्रमाणात प्राप्त असल्याने थकबाकी आहे.

(३) अशंत: खरे आहे.

उप विभागीय कृषी अधिकारी, उमरेड कार्यालयास नगर परिषद करासाठी नोटीस प्राप्त झालेली होती. सदर कार्यालयास मार्च २०१६ मध्ये भाडेपट्टी व कर अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून भरणा करण्यात आल्याने जप्तीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई ते दापोली (जि.रत्नागिरी) ह्या मार्गावर शिवनेरी पध्दतीच्या एसी बस सेवा सुरु करण्याबाबत

**(४७) ६४७३९ (२४-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते दापोली (जि.रत्नागिरी) ह्या मार्गावर शिवनेरी पध्दतीच्या एसी बस सेवा सुरु करण्याबाबत सातत्याने लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटनाच्या दृष्टीने दापोलीकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त असल्याने शिवनेरी पध्दतीच्या एसी बस सेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) राज्य परिवहन महामंडळाकडे मर्यादित स्वरुपात वातानुकूलित बसेस असून त्या मुंबई-पुणे, पुणे-बोरिवली, ठाणे-स्वारगेट, पुणे- औरंगाबाद, नाशिक-पुणे या मार्गावर चालविण्यात येत आहेत. या मार्गाखेरीज अन्य मार्गावर प्रवासी प्रतिसाद मिळत नसल्याचा पूर्वानुभव असल्याने

मुंबई-दापोली या मार्गावर शिवनेरी सेवा सुरु करता आली नाही. मात्र, मुंबई ते दापोली ह्या मार्गावर हिरकणी १० व साध्या ११ अशा एकूण २१ फेऱ्या दापोली व मुंबई आगाराकडून सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकोडी (ता.साकोली, जि.भंडारा) येथे नवीन मंडळ कृषी अधिकारी कार्यालयाचा प्रस्ताव वित्त विभागाकडून अमान्य केल्याबाबत**

**(४८) ६४७५३ (२९-०८-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २२ मे, २००९ च्या शासन निर्णयानुसार खात्याच्या पुनर्रचनेत भंडारा जिल्ह्याला मंजूर आकृतीबंधानुसार ७ तालुक्यापैकी ४ तालुक्यांना प्रत्येकी २ प्रमाणे मंडळ कार्यालयाची रचना करण्यात आली असून साकोली व लाखांदूर तालुका कृषी अधिकारी यांना १ मंडळ कृषी अधिकारी कार्यालय देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कृषी अधिकारी, साकोली कार्यालयाचे कार्यक्षेत्र सर्वात जास्त असल्याने या कार्यालयाची पुनर्रचना करुन साकोली सोबतच तालुक्यातील एकोडी येथे नव्याने मंडळ कृषी अधिकारी कायार्लय स्थापित करण्यासाठीचा रितसर प्रस्ताव मा. कृषी उपसंचालक (मबवि), कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडून शासनाकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ च्या पत्रानुसार पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागाकडून वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेला सदर प्रस्ताव, कार्यालय चालविण्यासाठी शासनावर आर्थिक भार पडणार असल्याच्या अटीवर अमान्य करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२६-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) साकोली तालुक्यातील एकोडी येथे नव्याने मंडळ कृषि अधिकारी कार्यालय स्थापित करण्यासाठीचा प्रस्ताव, कृषि आयुक्तालय, पुणे यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी कृषि विभागास सादर केला असून सदर प्रस्तावाची छाननी करून प्रस्ताव मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आला होता.

(३), (४) व (५) हे खरे नाही. सदर प्रस्तावा संदर्भात काही मुद्दयावर अधिक माहिती/खुलासा करण्याचे निदेश या विभागास देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने अहवाल प्राप्त करून फेर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

---

**ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी घेतलेल्या कर्जाची जबाबदारी शासनाने स्वीकारणेबाबत**

**(४९) ६४८१२ (२०-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळात होरपळलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी घेतलेल्या कर्जाची जबाबदारी शासनाने जास्तीत जास्त उचलावी असे नवे धोरण अंमलात आणण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे व त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे काय,

(३) असल्यास,निर्णयाअंती ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी घेतलेल्या कर्जाची जबाबदारी शासनाने जास्तीत जास्त उचलावी असे नवे धोरण अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-१०-२०१६) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील (जि.बीड) अल्पसंख्याक विद्यार्थी शिष्यवृत्ती व सवलतींपासून वंचित असल्याबाबत**

**(५०) ६४८४९ (२०-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील अल्पसंख्याक विद्यार्थी शिष्यवृत्ती व सवलतींपासून वंचित असल्याची बाब माहे जुलै २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदरहू अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्ती व सवलतीं अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

मेरीट-कम-मीन्स शिष्यवृत्ती व पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती यामध्ये अशी कोणतीही बाब आढळून आलेली नाही. मात्र मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (प्री मॅट्रीक) मध्ये विद्यार्थ्यांने बँक खात्याबाबत चुकीची माहिती भरणे, बँक खाते प्राप्त न होणे यामुळे काही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करणे प्रलंबित आहे.

(२) शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची माहिती घेण्यात येत आहे.
(३) शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांच्या प्रलंबित बँक खात्याची ऑनलाईन माहिती घेण्यासाठी वेब पोर्टल उपलब्ध करुन देण्यात आले आहे. शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना बँक खात्याची माहिती अपलोड करण्यासाठी लेखी सूचना/व्हॉटसअप मेसेजेस आणि बैठकांमधून सूचना दिलेल्या आहेत.
(४) खाते नंबर चुकीचा असणे, खाते बंद असणे, खाते उपलब्ध नसणे, खातेधारकाच्या नावात फरक असणे, आयएफएससी कोड सादर न करणे किंवा चुकीचा असणे इत्यादी कारणामुळे शिष्यवृत्ती वाटपात विलंब होत आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.